बुधवार दि.२३ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# संदीप नाईक यांचा शरद पवार गटात प्रवेश

# जयंत पाटील यांच्याकडून उमेदवारीचे संकेत

## वडील युतीचे तर मुलगा आघाडीचा उमेदवार?


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय खलबते सुरू असून पक्ष बदलण्यासाठी नेत्यांच्या उड्या देखील सुरू आहेत. यातच आता भाजपला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. भाजपचे नवी मुंबई जिल्हा भाजप अध्यक्ष संदीप नाईक यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते नाईक यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.विधानसभा निवडणुकीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची यादी लवकरच जाहीर होणार आहे. मात्र, त्याआधीच मी संदीप नाईकांच्या हातात तुतारी दिली असल्याचे सूचक वक्तव्य प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. या मतदारसंघात तुमच्या मनातील उमेदवार देऊ असे आश्वासनही त्यांनी उपस्थितांना दिले.संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक हे भाजपचे मोठे नेते असून पक्षाने त्यांना ऐरोली विधानसभा मतदारसंघातून तिकीट दिले आहे. तर संदीप यांना नवी मुंबईतील बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवायची आहे. मात्र पक्षाने या जागेवरून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे.अशा स्थितीत तिकीट न मिळाल्याने संदीप नाईक नाराज असून त्यांना बेलापूरची जागा शरद पवार गटाने देऊ केल्याचे मानले जात आहे. शरद पवार यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. संदीप नाईक हे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाच्या काही दिवसांपासून संपर्कात आहेत. मंगळवारी संदीप नाईक यांनी आपल्या समर्थकांसह जयंत पाटील यांच्या हस्ते प्रवेश केला. त्यामुळे त्यांना उमेदवारी देण्याची घोषणा देखील होण्याची शक्यता आहे.गणेश नाईक आणि संदीप नाईक यांचा नवी मुंबईत बराच प्रभाव असल्याचे बोलले जाते. नवी मुंबईतील ऐरोली मतदारसंघातून भाजपने संदीप नाई यांचे वडील गणेश नाईक यांना उमेदवारी दिली आहे. संदीप नाईक यांची मनधरणी करण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू असल्याचेही समोर आले आहे. मात्र, ते माघार घेण्याच्या तयारीत नव्हते.



# परतीच्या पावसाने माजविले थैमान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

केज । अमोल सावंत

केज तालुक्यात परतीच्या पावसाने थैमान मांडले आहे .मेघगर्जनेसह वीजांच्या कडकडटात धोधो पाऊस पडत यामुळे जनसामांन्य, शेतकरी यांचे फार नुकसान होउ लागले आहे.दि.२१/१०/१०२४ रोजी दुपारी ०१:३० वाजेच्या सुमारास काळेकुट्ट अभाळ आले ,सुसाट्याचा वारा वीजेच्या कडकडात पाउस जोरदार सुरु झाला. मौजे तरनळी येथे शेतीवर आधारीत जोडधंदा आसणारा शेळीपालन ग्रामीण भागामध्ये केला जातो आशाच प्रकारे तरनळी येथील अभिमान सारुख हे आपल्या शेळ्या घेउन शेतात चारण्यासाठी गेले असता दुपारी वीज पडुन त्यांच्या दोन बकरे व एक शेळी यावर वीज कोसळुन जागीच मृत्यु झाला या घटनेने तरनळी गावात हळशळ व्यक्त होत आहे.शासना मार्फत त्यांना आर्थीक मदत मिळण्याचे आव्हान हो आहे.तसेच मौजे नाव्होली येथे खंडोबाच्या मंदीराजवळ आसणार्या ओड्याला पानी भरपुर आल्याने नांदुर केज जारा मुख्य रस्ता आर्धा तास ठप्प होता ,नांदुर केज बस पानी आसल्याने पावसात जाग्यावर उभी केली वाहतुक ठप्प झाली . प्रवाशाचे हाल झाले.

# लोकसभा पोटनिवडणुकीत आपला मायेचा हात माझ्या पाठीशी असावा-प्रा.रविंद्र चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नायगाव । माधव बैलकवाड

आज पासून माझा राजकीय प्रवास सुरू झालेला आहे,आपला मुलगा छोटा भाऊ समजून नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत मी काँग्रेस पक्षांच्या वतीने उमेदवार म्हणून उभा आहे माझे आजोबा कै.बळवंतराव चव्हाण आणि माझे वडील स्वर्गीय खा.वसंतराव चव्हाण यांचा वारसा नेटाने पुढे चालविन अनेक वर्षापासून चव्हाण परिवाराची जनसेवा चालू आहे ती पुढे चालविण्यासाठी या पोटनिवडणुकीत मला आपण संधी द्यावी आपल्या सेवेला कणभरही कमी पडणार नाही असे भावनिक मत प्रा.रविंद्र चव्हाण यांनी आयोजित संवाद बैठक कार्यक्रमात व्यक्त केले.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या निवासस्थानी आयोजित संवाद बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य



माधवराव बेळगे,ज्येष्ठ नागरिक केशवराव पाटील चव्हाण,वसंतराव मेडेवार सावकार, हनुमंतराव पाटील चव्हाण,माजी प्राचार्य ह.सं. खंडगावकर, शिवाजी पाटील गोळेगावकर,हनुमंतराव पाटील सुजलेगावकर,श्रीनिवास पाटील चव्हाण,माधवराव पाटील शिंदे, सुरेश पाटील कल्याण,दत्ता पाटील ईजतगावकर, मोहन सावकार यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रारंभी प्रा.मो.ज.चव्हाण यांनी प्रस्तावनेतून आपले मनोगत मांडल्या नंतर रवींद्र भालेराव महेश चव्हाण प्रकाश भाऊ हनुमंते पवन गादेवार बालाजी मेडेवार शंकर गोटलावार राजेंद्र कांबळे गणेश नायगावकर यांनी आपले विचार मांडले, प्रा.रवींद्र चव्हाण बोलताना पुढे म्हणाले की, वसंतराव चव्हाण यांच्यामध्ये कोणत्याही शक्तीचा सामना करण्याची ताकद होती कारण त्या ताकदीमागे आपल्या सर्वांचा आशीर्वाद पूर्वीपासूनच मिळत होता याची जाणीव चव्हाण परिवारांना आहे ते कदापि विसरता येणार नाही जी वेळ आपल्यावर येऊन ठेपलेली आहे आणि वसंतराव चव्हाण यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ही पोटनिवडणूक अत्यंत महत्त्वाची असून गेल्या पन्नास वर्षापासून चव्हाण परिवारांची जनसेवा चालू आहे ती सेवा अखंडितपणे पुढे चालविण्यासाठी या पोटनिवडणुकीत मला आपण भरघोस मताने संधी प्राप्त करून द्यावी आपल्या सेवेला मी कदापी कमी पडणार नाही असेही प्रा. रवींद्र चव्हाण यांनी बोलत असताना आपले अश्रू त्यांना आवरता आले नाही. यावेळी श्रीधर चव्हाण डॉक्टर विश्वास चव्हाण, पंढरीनाथ भालेराव शरद भालेराव माणिक चव्हाण यासह नायगाव शहरातील व्यापारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी शिंदे यांनी तर आभार विजय पाटील चव्हाण यांनी मानले आहे.

## केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा येथील

# विद्यार्थ्यांनी मतदान करून घेण्याचा केला निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

विधानसभा निवडणूक २०२४ साठी २० नोव्हेंबर २०२४ ला मतदान होणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून निवडणूक विभागाच्या निर्देशानुसार संकल्पपत्र घेण्याचे आवाहन केले आहे.



त्याचा प्रतिसाद म्हणून लोहा ८८ विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती अरुणा संगेवार व तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विठ्ठल परळीकर, गटशिक्षणाधिकारी सतीश व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मारतळा येथील वर्ग पहिली ते सातवीच्या १५८ विद्यार्थ्यांना संकल्पपत्र देण्यात आले. त्यात आई-वडिलांना मतदान करण्यासाठी भावनिक आवाहन केले आहे. तसेच पालकांचा ठराव म्हणून आम्ही मतदान करणारच तसेच शेजारी आणि मित्रमंडळी यांना सुद्धा मतदान करण्यास प्रेरित करणार असल्याचे नमूद करून त्यावर आई-वडिलांची स्वाक्षरी आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक रवी ढगे, व्यंकटराव मुगावे, श्रीमती रेवती दमकोंडवार, देवबा होळकर, श्रीमती जयश्री बारोळे, माधुरी मलदोडे, सुप्रिया लांडगे, श्याम पाटील मारतळेकर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोणार शहरातील व तालुक्यातील विद्युत वितरण मंडळाने

# सर्व डीपी चे कामे करून घेणे आवश्यक-नंदकिशोर मापारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोणार सरोवर । विनायक कुटे

दि २१ ऑक्टोंबर २०२४ लोणार तालुक्यातील व शहरातील अनेक डीप्यांची दुरुस्ती येणाऱ्या दिवाळी सणाच्या अगोदर करण्यात यावा अशी मागणी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी महावितरण कंपनीने केली आहे.शहरातील संपूर्ण डीपी चे दुरुस्ती कामे करावी आगामी दीपावली सणानिमित्त शहरातील उघड्या डीपीमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या लक्षात येताच त्यांनी महावितरण कंपणच्या अधिकारी यांना सांगून शहरातील अनेक डिप्या नादुरुस्त असल्याने नागरिकांना व



व्यापाऱ्यांना विध्यार्थी वारं वार बंद होणारा विद्युत पुरवठा यांना त्रास सहन होत आहे . त्यामुळे होणारा त्रास लक्षात घेता.संबधीत विज अभियंता यांच्या लक्षात आणून दिले वारंवार विद्युत खंडित होत असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनानी विद्युत पुरवठा खंडित होत आहे. असी समस्या घेऊन शिवछत्र मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी आले.संबधीत अधिकारी यांना सुचना देत डिपी दुरुस्ती करण्यात यावी व दिवाळी पुर्वी गावकऱ्यांना दिवाळी अंधारात साजरी होण्यापासून वाचवले पाहिजे अशी मागणी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी केली आहे.

## झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

नात्यांचा धागा
अलगद गुंफत जावा
स्वार्थ न ठेवावा मनी
खरा अर्थ जाणूनी घ्यावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# शिवसेना (शिंदे गट) ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष पदी संदिप हाके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटन मजबूत करून पक्षाला बळकटी देण्यासाठी पक्षाच्या वरिष्ठ स्तरावरून पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येत आहेत. त्यानुषंगाने शिवसेना (शिंदे गट) ओबीसी सेल लोहा तालुकाध्यक्ष पदी युवा कार्यकर्ते संदीप हाके यांची निवड करण्यात आली.

शिवसेना (शिंदे गट) सध्या निवडणुकीच्या तोंडावर सक्रिय झाला असून स्थानिक पातळीवर पक्षांतर्गत मोठा फेरबदल करण्यात आला आहे. शिवसेना (शिंदे गट) ओबीसी सेल लोहा तालुका अध्यक्ष पदी युवा कार्यकर्ते संदीप हाके यांची निवड करण्यात आली. सदरील निवडीचे पत्र शिवसेना ओबीसी सेल चे जिल्हाध्यक्ष अनिल पाटील धमने यांनी हाके यांना दिले. यावेळी नांदेड दक्षिण ओबीसी सेलचे तालुका उपाध्यक्ष विजय पांचाळ, साईनाथ पांचाळ, संतोष मामिडवाड, अमोल महामूने, विश्वनाथ जोशी आदींची उपस्थिती होती.



# लाडकी बहीण योजना बंद केल्याची बातमी खोटी

लोकनेता न्यूज नेटवर्क । मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील राजकारणात गेम चेंजर ठरु शकणारी लाडकी बहीण योजना बंद करण्यात आली, अशी खोटी बातमी काही वृत्तपत्रे आणि चॅनेलने लावली. ही धादांत खोटी बातमी त्यांनी का लावली? हे कळायला मार्ग नाही. ही योजना अत्यंत चांगली आहे. राज्यातील महिलांमध्ये लोकप्रिय झाली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. या बातम्यांवरून अजित पवारांनी माध्यमांवर टीका केली.

# जिल्हा मुख्यालय व त्रिदल आजी माजी सैनिक असोसिएशन आष्टी संघटनेचा तृतीय वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

बीड जिल्हा मुख्यालय व त्रिदल आजी माजी सैनिक असोसिएशन आष्टी संघटनेचा तृतीय वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी संघटनेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष,उपाध्यक्ष,सचिव संचालक सर्व सदस्य व भरभरून आजी-माजी सैनिकाचा सहभाग होता तसेच संघटनेतील सर्व पदाधिकारी व सर्व माजी सैनिकांच्या पत्नी व मुले मोठ्या संख्येने हजर होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष सावळेराम खामकर साहेब हे होते आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला संघटनेतील सर्व माजी सैनिक व सर्व महिला भगिनींना मार्गदर्शन केले आपल्या परिवाराची व स्वतःच्या तब्येतीची काळजी घेण्याचे मार्गदर्शन केले व माजी सैनिकांनी नशा करण्याचे प्रमाण कमी करावे असेही त्यांनी सांगितले व सर्वांना वर्धापन दिनाचे औचित्य साधून भरभरून शुभेच्छा दिल्या.तसेच संघटनेचे अध्यक्ष राजू जगदाळे यांनीही आपल्या शब्दातून संघटनेतील पदाधिकारी व सर्व माजी सैनिकांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या व संघटनेमध्ये कशा पद्धतीने काम करावे याबद्दल मार्गदर्शन केले व सर्व पदाधिकारी व सर्व माजी सैनिकांनी संघटनेला पुढे नेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे मार्गदर्शन केले तसेच संघटनेचे उपाध्यक्ष भीमराव वाल्हेकर साहेब यांनी संघटनेतील सर्व माजी सैनिक व महिला भगिनींना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व सर्व माजी सैनिकाच्या पत्नीचाही पतीच्या यशाच्या पाठीमागे फार मोठा हात असतो व महिलांनीही पुढे येऊन संघटनेमध्ये महिला आघाडीच्या माध्यमातून काम करावे असे मार्गदर्शन केले.यावेळी संघटनेचे सचिव भीमराव घाडगे साहेब यांनी संघटनेतील सर्व पदाधिकारी संचालक सदस्य तसेच सर्व माजी सैनिक व सर्व महिला भगिनींना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व संघटनेमध्ये सर्वांनी संघटित होऊन काम करावे ही संघटना पुढे नेण्यासाठी सैनिकांनी व सैनिक पत्नीने ही योगदान द्यावे आणि संघटित होऊन एकमेकांच्या अडचणीस एकमेकांच्या पाठीमागे उभे राहून एकमेकांना सहकार्य करावे,ही संघटना सैनिक आणि सैनिकाच्या परिवाराच्या



अडचणीसाठी स्थापन करण्यात आलेली आहे आणि कोणत्याही सैनिकास पेन्शन बद्दल .. हॉस्पिटल ची सेवा जिल्हा सैनिक बोर्डाची सेवा कॅन्टीन सेवा अशा काही समस्या असतील तर संघटनेमध्ये येऊन समस्या नोंदवावी आणि आपल्या समस्याचे निवारण करण्यात येईल असे आश्वासन दिले तसेच आपल्या संघटनेचे कायदे सल्लागार बाळासाहेब शिंदे साहेब यांनी सैनिकांना कायदे कानून बद्दल मार्गदर्शन केले आणि कोणालाही काही अन्याय होत असेल तर संघटनेमध्ये एकत्रित होऊन त्यांना संघटनेने सहकार्य करावे व काही अडचण आल्यास आपण मदत करू असे ही आश्वासन दिले यावेळी महिलांच्या वतीने ही पुढे येऊन बोलण्याचे व महिला भगिनींना संघटनेबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी महिला भगिनींनी सहभाग घेतला संघटनेचे डायरेक्ट नारायण झगडे साहेब यांच्या पत्नी यांनीही संघटनेतील वर्धापन दिनाच्या सर्वांना भरभरून शुभेच्छा दिल्या व महिला भगिनींना आपण सर्वांनी एकत्रित येऊन आपणही संघटित होने गरजेचे आहे व माजी सैनिकाच्या पाठीमागे उभे राहून त्यांना सहकार्य करण्याची गरज आहे असे सर्व महिलांना कडाडून सांगितले तसेच संघटनेचे सल्लागार अरुण शेंडगे साहेब यांच्या पत्नी यांनी संघटनेच्या वर्धापन दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या व महिलांना मार्गदर्शन केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सावळेराम खामकर 'वाहीरा',राजू जगदाळे अध्यक्ष,भीमराव वाल्हेकर उपाध्यक्ष,भीमराव घाडगे सचिव,जालिंदर धोंडे 'संचालक' 'पोपट गायकवाड 'संचालक',नारायण झगडे 'संचालक',महादेव खेडकर सचिव,कांतीलाल आजबे,परसराम गळगटे 'संचालक',कैलास रेडेकर'सहसचिव',बाळासाहेब शिंदे 'कायदे सल्लागार',गोरख पवार 'मुर्शदपुर' शाखा अध्यक्ष, रघुनाथ खोले उपाध्यक्ष,मधुकर बमदाळे 'ह.आष्टा' शाखा अध्यक्ष

अर्जुन गळगटे उपाध्यक्ष, भीमराव खाडे 'वाळुंज'शा. अध्यक्ष,वासुदेव खाडे 'उपाध्यक्ष', धनंजय गावडे 'सचिव', गौतम तवले 'संचालक,'भाऊसाहेब भोसले 'सल्लागार',प्रल्हाद तोडकर,प्रल्हाद आजबे,लक्ष्मण जगताप अरुण शेंडगे

,नवनाथ जरे,अंबादास तोडकर, दामोदर चव्हाण,राजेंद्र भोसले, भीमराव काकडे,गोवर्धन तरटे, सोपान कोकणे यावेळी पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे व आदी बीड जिल्हा मुख्यालय व त्रिदल आजी माजी सैनिक असोसिएशन आष्टी संघटनेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त सर्व पदाधिकारी,संचालक,सर्व सदस्य व आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# हुतात्मा झालेल्या जवानांना दौंड येथे राज्य राखीव पोलीस दलातर्फे मानवंदना

## हुतात्मा झालेल्या कुटुंबियांची केली आस्थेने विचारपूस



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या देशातील पोलिस अधिकारी व जवानांना दौंड शहरात डठझक्र आणि पोलिसांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.राज्य राखीव पोलिस दल गट क्रमांक पाच येथे मानवंदना देण्यात आली.


दौंड येथील राज्य राखीव पोलिस दलाच्या कवायत मैदानावर सोमवारी (ता.२१) हुतात्मा पोलिसांना अभिवादन करण्यात आले.देशभरात १ सप्टेंबर २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२४ या कालावधीत कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या नामावलीचे या वेळी वाचन पोलिस हुतात्मा दिन लडाखच्या पूर्वोत्तर भागातील हॉटस्प्रिंग येथे २१ ऑक्टोबर १९५९ रोजी केंद्रीय राखीव पोलिस सुरक्षा दलाच्या तुकडीवर चिनी लष्कराच्या बटालियनने केलेल्या हल्ल्यात भारताचे दहा जवान हुतात्मा झाले होते.हुतात्मा झालेल्या पोलिसांप्रमाणे राष्ट्रनिष्ठेची ज्योत पोलिसांसह सर्वसामान्य नागरिकांच्या मनात सदैव तेवत राहावी,याकरिता जानेवारी १९६० मध्ये झालेल्या देशाच्या सर्व पोलिस महानिरीक्षकांच्या परिषदेत दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलिस हुतात्मा दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेण्यात आला होता.त्यानुसार पोलिस हुतात्मा दिनी अभिवादन केले जाते.

राज्य राखीव पोलिस दल गट क्रमांक सातच्या समादेशक राजलक्ष्मी शिवणकर, गट पाच चे समादेशक सोमनाथ वाघचौरे आणि पुणे ग्रामीण पोलिस दलाच्या बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली.

सहाय्यक समादेशक सचिन डहाळे यांच्या नेतृत्वाखालील पोलिस पथकांनी रायफलीच्या तीन फैरी हवेत झाडल्या. नक्षलग्रस्त व अन्य भागांमध्ये कर्तव्य बजावताना हुतात्मा झालेल्या दौंड येथील गटांमधील पोलिसांचे कुटुंबीय या वेळी उपस्थित होते.हुतात्मा झालेल्या कुटूंबियांची समादेशक राजलक्ष्मी शिवणकर आणि समादेशक सोमनाथ वाघचौरे यांनी आदरपूर्वक विचारपूस केली.यावेळी गट क्रमांक पाच व सात येथील सर्व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या कडून कौतुकाची थाप

## हीच केलेल्या उत्कृष्ट कामाची पोचपावती



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये प्रचार व प्रसार माध्यम समिती चे नोडल अधिकारी अंकुश म्हस्के व सहाय्यक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे यांनी केलेल्या कामाची जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी घेतली. वर्तमानपत्रातील बातम्यांचा संग्रह केलेली फाईल बघून मा.जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. किरण पाटील यांनी केलेल्या कामाचे मनापासून कौतुक केले.

मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शना खाली त्यांनी दाखवलेला विश्वास तसेच वेळोवेळी त्यांनी प्रसारमाध्यम समितीला केलेल्या सूचना आणि त्या सूचनांवर केलेली अंमलबजावणी यातूनच आमच्या पूर्ण टीमला मोकळेपणाने काम करायची ताकद प्रा. खडसे यांनी दिली.

प्रसार माध्यामाचे नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के यांनी देखील चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले जेणेकरून सर्वांना काम करण्यासाठी एक विश्वासपूर्ण वातावरण मिळाले. अंकुश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण टीम ने चांगल्या प्रकारे काम पूर्ण केले.

तसेच तत्कालीन मा. तहसीलदार सिंदखेड राजा धानोरकर सर, मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळा, मा. निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव,मा.निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा अस्मा मुजावर, उमेश गरकळ, संजय सोनुने यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन वेळोवेळी लाभले. या सर्व प्रक्रियेमध्ये सर्वात महत्वाचा वाटा हा आपल्या सर्व पत्रकार बांधवांचा आहे, सिंदखेड राजा मतदारसंघातील सर्व पत्रकार बांधवांनी खूप चांगल्या प्रकारे लोकसभा निवडणुकीमध्ये प्रसार माध्यमाला प्रसिद्धी मिळवून दिली. आपण सर्वांनी वेळोवेळी दिलेल्या बातम्या यामुळेच आपला हा बातम्याचा संग्रह होऊ शकला, त्यामुळे या सर्व प्रक्रियेमध्ये सर्व पत्रकार बांधवांचे योगदान खूप मोठे आहे तसेच सर्वांच्या सहकार्याने विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये सुद्धा असेच चांगले काम करू असे सहाय्यक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे, दैनिक लोकनेता प्रतिनिधी सोबत बोलताना म्हणाले.

# वालसावंगीत बारी दिवस उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

:बारी समाजाचे आराध्य दैवत शूरवीर रूपम बारी यांची यांच्या जयंतीनिमित्त साजरी करण्यात येणारा बारी दिवस आज येथील ग्रामपंचायत कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने वीर रुपम बारी यांच्या प्रतिमेचे पूजन येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हिरालाल कोथलकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन मान्यवरांनी अभिवादन केले.बारी दिवस साजरा करताना रूपम बारी यांच्या आठवणींना त्यांच्या पराक्रमाला उजाळा देण्यात आला.यावेळी ग्रामविकास अधिकारी सुनील पडोळ, किरणराजे कोथलकर,अजिंक्य वाघ,गणेश गाडेकर,विशाल अस्वार,गणेश दामधर,लक्ष्मण मळेकर,संदीप लोखंडे,तुकाराम फुसे,भगवान पायघन,दिनेश कोथलकर,आत्माराम पवार,संजय कोथलकर,संजय वाघ,यासह अनेक ग्रामस्थ व समाजबांधव यांची उपस्थिती होती.

# रोषनगाव येथे युवा नेते यादव जाधव यांच्या नेतृत्वामध्ये डॉ.मीनल खतगावकर यांचे फटाकेच्या आतिषबाजीने वाजत गाजत जंगी स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

नायगाव विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या संभाव्य उमेदवार डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव व विविध गावांमध्ये जनसम्मान यात्रा काढली. या यात्रेला सर्वसामान्य जनतेतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी काल सोमवार येथे जनसन्मान यात्रेमध्ये उपस्थित मान्यवर गणेशराव पाटील करखेलीकर, नागोराव पाटील रोशनगावकर, बाळासाहेब पाटील खतगावकर, उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी महाराज,दिगाबर लखमवाड, तालुका संघटक मारुती पाटील कॉंगेरू, जयराम पाटील बाभळीकर,हानंमतराव पाटील बामणीकर, गंगाधर पा नरवाडे, शंकर पाटील खतगावकर, आनंदराव पाटील शिंदे, मारुती दगडे, युवा नेते ओम पाटील भाले, संगम सरपंच विठ्ठल पाटील आष्टे , युवा तरुण तडफदार नेते कामाजी पाटील चिंचोलीकर ,महेबूब शेख, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.





सर्व मान्यवरांच रोशनगावकर परिवारातर्फे शाल ,हार, देऊन सत्कार करण्यात आले . उपस्थित सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, तंटामुक्ती अध्यक्ष माधवराव नारायण पाटील माळगे, माधवराव ईरना माळगे, हानमंत जयराम पा माळगे, संभाजी लक्ष्मण माळगे , नागनाथ माधवराव माळगे, हानमत तिपाजी माळगे, दिनेश पाटील जाधव, त्रिंबक पा माळगे, संभाजी पाटील जाधव, विठ्ठल लक्ष्मण शिवशटटै,भुजंग पाटील जाधव, माधवराव गंगाधर शिवशटटै, शिवाजी पिराजी माळगे, नागनाथ शंकरराव माळगे, सदानंद शंकरराव माळगे, सुरज जाधव, मारोती पा शिवशटटे, माजी उपसरपंच अशोक लक्ष्मण माळगे , बाळू महाराज, मनमत करण स्वामी, तथा धर्माबाद तालुक्यातील हसणाली, येवती , येताळा, समराला, मंगनाळी, आतकुर, मंडळी पाटोदा खु, पाटोदा बु ,रोषनगाव येथे जंगी स्वागत करण्यात आले.विविध गावामध्ये जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला ठिकठिकाणी मीनल खतगावकर यांचे सौ.भारतबाई शिवराज भंडगे यांनी हार शाल देऊन सत्कार करण्यात आले . युवा तरुण तडफदार यादव पाटील जाधव,अविनाश माळगे, विकास शिवशटटे, मारोती शिवशटटे, शिवलिंग जाधव, समस्त गावकऱ्यांच्या वतीने गावांमध्ये जंगी स्वागत केले आहे. यावेळी मीनल खतगावकर यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच वयोवृद्ध नागरिक, महिला व तरुण वर्गाची त्यांनी चर्चा केली समाजातील मूलभूत सुविधा विषयी माहिती घेऊन सोडविण्याचे आश्वासन दिले. तसेच बाभळी बंधारा बॅक वॉटर मुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी ही मागणी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली व अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी त्यांनी भेट घेऊन शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. डॉ. मीनल पाटील खतगावकर यांनी धर्माबाद तालुक्यात जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून मतदारांशी संवाद दौरा सुरू केल्याने जनतेमध्ये उत्साह आनंदउत्सव निर्माण झाला आहे. धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथे डॉ.मीनल खतगावकर यांच्या दौऱ्याला उस्पूर्त प्रतिसाद जंगी स्वागत गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले .

# कै.मैनाबाई बुंदेले प्रतिष्ठानच्या अल्बमचे विमोचन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अचलपूर | प्रतिनिधी**

येथील नशीबपुरा येथे असलेल्या बुंदेले निवासातील मंदिरामध्ये कोजागिरी पौर्णिमेनिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठानच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याच्या प्रथम फोटो अल्बमचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन झाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री भगवंतरावजी बुंदेले ( माजी एपीआय ),प्रमुख अर्तिथी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बुंदेले (अभंगकार व साहित्यिक ),प्रतिष्ठानच्या सचिव सौ.ज्योती बुंदेले,सौ.गोकुळा बुंदेले,श्री गणेशराव बुंदेले, सौ.कुसुम बुंदेले,श्री.विठ्ठलराव वाडेकर,सौ.संगीता वाडेकर,श्री मनोज नासने,सौ.दीपाली नासने श्री मोहनराव बुंदेले,सौ.संध्या बुंदेले,श्री मंगेशराव बुंदेले,सौ. पूनम बुंदेले तथा श्री प्रभाकर इंगळे,सौ.लता इंगळे,श्री दामोदर खंडारे, श्रीमती प्रीती धुमाळे, सौ.भामोदे ,सौ.लता खंडारे, चि.शिव नासने,चि.साई नासने, कु.ओवी बुंदेले,चि.ओजस बुंदेले यांची उपस्थिती होती.



### कैं.मैनाबाई बुंदेले प्रतिष्ठानचे कार्य वाखाणण्यासारखे–श्री भगवानराव बुंदेले

अध्यक्षीय भाषणामध्ये श्री भगवानराव बुंदेले (माजी एपीआय ) यांनी, मातोश्री कै. मैनाबाईच्या नावे माझे धाकटे बंधू प्रा.अरुण बुंदेले यांनी स्थापन केलेल्या प्रतिष्ठानचे कार्य वाखाणण्यासारखे आहे. आई–वडिलांचे नाव प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्याने सर्वदूर पोहचविले आहे पुढेही त्याचे हे कार्य सुरूच राहील ही सदिच्छा व्यक्त करतो. असे विचार व्यक्त केले.कार्यक्रमाचे संचालन सदस्य सौ.दिपाली नासने तर आभार सचिव सौ.ज्योती बुंदेले यांनी मानले.कार्यक्रमाला समाज बांधव फार मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.कार्यक्रमाची सांगता भोजनाने झाली.

### आई–वडिलांच्या प्रेरणेतून प्रतिष्ठानचा जन्म–प्रा.अरुण बुंदेले

प्रमुख अतिथी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बुंदेले यांनी आपल्या भाषणात प्रतिष्ठानच्या कार्याचा परिचय देताना सांगितले की, दि.९ डिसेंबर २०१० रोजी मातोश्री कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले यांच्या बाराव्या स्मृतिदिनानिमित्तआई–वडिलांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठानचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून सुरू आहे.आजपर्यंत अनेक शाळा – कॉलेजमधील दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती पारितोषिक व कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले स्मृती पारितोषिक रोख रक्कम, सन्मानपत्र,पुष्पगुच्छ,मोमेंटो देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे तो आजही सुरूच आहे.कारण शाळेला प्रतिष्ठानने (प्रा.अरुण बुंदेले यांनी आई–वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ)दिलेल्या दानाच्या रकमेच्या व्याजातून हे पारितोषिक दरवर्षी विद्यार्थ्यांना देण्यात येते.याशिवाय समाजामध्ये विविध कार्य करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा त्यांच्या कार्याचा कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले समाजसेवा गौरव पुरस्कार व कै.बाबारावजी वायलाजी बुंदेले शैक्षणिक पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केलेले आहे. तथा समाजातील सन्माननीय व्यक्तींचे वाढदिवस त्यांच्या गृहालयी जाऊन प्रतिष्ठानने त्यांना सन्मानित केलेले आहे.यापुढेही असेच कार्य सुरू ठेवण्याचा मानस यावेळी त्यांनी व्यक्त केला.

---

### परळी विधानसभेत होऊ शकतो मुंडे विरुद्ध मुंडे सामना ?

# वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून परळी विधानसभेसाठी विष्णू मुंडे इच्छुक

**प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्याकडे केली विष्णू मुंडे यांनी परळी विधानसभेच्या उमेदवारीची मागणी**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

वंचित बहुजन आघाडीने आत्तापर्यंत महाराष्ट्रातील वंचित बहुजन आघाडी कडून निवडणूक लढवणाऱ्या अधिकृत उमेदवारांच्या पाच याद्या जाहीर केली आहे. प्रचारासाठी वेळ कमी असल्यामुळे आता पुढील यादी लवकरच जाहीर होईल. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. प्रकाश आंबेडकर, प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकूर, जिल्हा प्रभारी प्रा.किसन चव्हाण यांच्याकडे परळी विधानसभाची विष्णू मुंडे यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. परळी विधानसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या गटाकडून माजी मंत्री धनंजय मुंडे हे विधानसभेचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडी कडून जर विष्णू मुंडे निवडणुकीच्या मैदानात आले तर मुंडे विरुद्ध मुंडे असा सामना पाहायला मिळेल.




वंचित बहुजन आघाडी पक्ष जो निर्णय घेईल तो माला मान्य आहे,असे त्यांनी सांगितले ज्यावेळी पक्षाने जो आदेश दिला आहे तो ऐकला आहे व त्या पद्धतीने आज पर्यंत काम केले आहे.बीड जिल्ह्यातील बीड, केज,परळी येथील उमेदवार जाहिर होणे बाकी आहे. परळी विधानसभा मतदार मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे माजी परळी तालुका महासचिव विष्णू मुंडे यांनी पक्षाची इच्छुक उमेदवारी अर्ज करून मागणी केली आहे. ते गेल्या आनेक वर्षां पासून ते काम करत आहे. परळी विधानसभा मतदान संघातून वंचित बहुजन आघाडीचे परळी तालुक्यातील टोकवाडी येथील माजी तालुका महासचिव विष्णू मुंडे यांनी देखील, मुंबई येथील प्रदेश कार्यालयात जाऊन पक्ष श्रेष्ठशी चर्चा देखील केली आहे. परळी विधानसभेसाठी साठी कोणाची वर्णी लागते याकडे सर्व जिल्ह्याचे व राजकीय पक्षाचे लक्ष आहे.वंचित बहुजन आघाडीमुळे,स्थापन झाल्यापासून राज्याच्या राजकारणात अनेक मोठे उलट फेर व बदल केले आहेत. वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार कोण ? हा सध्या बीड जिल्ह्यात चर्चेचा विषय आहे.

---

# बिलोली येथिल रासायनिक मिश्रित शिंदी मुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात:उत्पादन शुल्क विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंड**

बिलोली शहरात आसलेल्या एका ताडी दुकानातून तालुक्यांतील संपुर्ण ग्रामीण भागात प्लास्टिक पिशव्या मध्ये रासायनिक मिश्रीत शिंदी दुकानदारांकडून अवैधरित्या पुरवठा केला जात आहे. या रासायनिक मिश्रित शिंदीमुळे शिंदी सेवन करणाऱ्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे.या गंभीर बाबीकडे उत्पादन शुल्क विभाग जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे सुज्ञ नागरिकांतून बोलले जात आहे.

बिलोली शहारा लगत व तेलंगणा राज्यातील बोधनकडे जाणाऱ्या महामार्गावर एक ताडीचे दुकान आहे. या ताडीच्या दुकानात दररोज हजारो लिटर रासायन मिश्रित शिंदी तयार केली जाते.ही रासायन मिश्रित शिंदी तालुक्यातील अनेक गावं खेड्यात आपल्या एजेंट मार्फत सहज पोहचं केले जाते. ही रासायन मिश्रित शिंदी तालुक्यातील अनेक गावात सहज उपलब्ध होत असल्याने अनेक नागरिक त्यांचे सेवन करीत आहेत. त्यामुळे ही रासायन मिश्रित शिंदी प्लास्टिकच्या पॉकेटमध्ये येत असल्याने व अनेक नागरिक त्याचे सेवन करीत असल्याने प्लास्टिक व रासायन मिश्रित असलेले शिंदीमुळे शिंदी सेवन करणाऱ्या नागरिकांचे आरोग्य वरच्यावर धोक्यात जात असल्याचे चित्र निर्माण होत आहे. या गंभीर बाबीकडे उत्पादन शुल्क विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने अनेक नागरिक या रासायन मिश्रित शिंदीच्या आहारी जात असल्याने अनेकांचे संसार देशोधडीला लागत आहे. या रासायन मिश्रित व प्लास्टिकच्या पिशवीत गाव खेड्यात पोहोच होणारी शिंदी तात्काळ बंद करावी अशी नागरिकांची मगणी जोर धरत आहे.

---

# आष्टी विधानसभेची जागा भाजपला सोडण्याबाबत पंकजाताई मुंडे आग्रही;अजित पवारांची घेतली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

महाराष्ट्रातील येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.सोमवारी रात्री पंकजा मुंडे यांनी अजित पवार यांची देवगिरी या त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यातील जागा वाटपावर चर्चा करत आष्टी विधानसभा मतदार संघ हा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावा यासाठी आग्रही भूमिका मांडल्याचे सूत्रांनी सांगितले.बीड जिल्हा हा भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.मात्र मध्यंतरी राज्यातील राजकीय उलथापालथ झाल्याने महायुतीच्या सरकार मध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट सामील झाल्याने जागावाटपात बालेकिल्ला असलेल्या बीड जिल्ह्यातील



भाजपला सामंजस्यातून किती जागा मिळतील यावर खलबत सुरू आहेत.मात्र आष्टी विधानसभेची जागा ही भाजपकडेच असावी यासाठी पंकजाताई मुंडे आग्रही असल्याचे या भेटी वरून दिसून येत आहे.त्यातच भाजपने पहिल्या यादीत केजमधून आ.नमिता मुंदडा यांचे नाव निच्छीत केल्याने आता आष्टी विधानसभेची जागा कुणाला मिळणार आणि यामध्ये उमेदवार म्हणून कुणाला संधी मिळणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

जागा वाटपावरून महायुतीतून मोठ्या प्रमाणावर खलबते सुरू असताना आष्टी मतदार संघातून सुरेश धस यांनी निवडणूक लढवावी यासाठी कार्यकर्ते आग्रही असल्याचे दिसत असून.धस यांनी देखील याबाबत मंगळवारी मुंबई येथे पंकजा मुंडे यांची सदिच्छा भेट घेत विधानसभा निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा केल्याचे समजते.

---

### आष्टी येथे आज होणाऱ्या मुस्लिम बांधवांच्या मेळाव्यास

# मोठ्या संख्येने उपस्थित रहावे नगरसेवक अस्लम बेग यांचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवार दि.२३ आक्टोबर रोजी आष्टी येथील लक्ष्मी लान्समध्ये मतदार संघातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाज बांधवांच्या संवाद मेळावा होत आहे.या मेळाव्याचे संयोजन युवानेते अजितदादा धोंडे हे करत आहेत.या मेळाव्याला मतदार संघातील मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टीचे नगरसेवक अस्लम नियामत बेग यांनी केले आहे.

नगरसेवक अस्लम बेग यांनी सांगितले की, माजी आ.भीमराव धोंडे हे





एकमेव नेते आहेत की,ते सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन विकास कामे करतात. त्यांनी २० वर्षात आष्टी मतदार संघाचा सर्वांगीण विकास केलेला आहे. आष्टी विधानसभा मतदार संघात अल्पसंख्याक मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने आहेत.अनेकजण शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत.त्यांच्या अनेक समस्या आहेत.त्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर चर्चा करण्यासाठी आज बुधवारी आष्टी येथे संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.आष्टी,पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील अल्पसंख्याक मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते व समाज बांधवांनी लक्ष्मी लॉन्स खडकत रोड आष्टी येथे सकाळी ११ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगरसेवक अस्लम बेग यांनी केले आहे.

---

# ना.धनंजय मुंडे २४ ऑक्टोंबर रोजी दाखल करणार उमेदवारी अर्ज पंकजा ताई मुंडे याही राहणार उपस्थित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

परळी कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे दिनांक २४ ऑक्टोंबर गुरुवार रोजी २३३ परळी विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत .यावेळी भाजपाच्या राष्ट्रीय सरचिटणीस तसेच विधान परिषदेच्या सदस्या आ.पंकजाताई मुंडे याही उपस्थित राहणार आहेत .

दिनांक २२ ऑक्टोबर पासून परळी विधानसभा मतदारसंघासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करणे सुरू झाले आहे. विद्यमान आमदार व राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे गुरुवार दिनांक २४ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ ते ३ यादरम्यान आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करताना साध्या पद्धतीने



तसेच कोणतीही सभा न घेता आपला अर्ज दाखल करणार आहेत.

यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्या व भाजपाच्या ज्येष्ठ नेत्या आमदार पंकजाताई मुंडे तसेच महायुतीचे घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

---

# सेनगाव येथे भाजपच्या वतीने बुथ बांधणी मेळावा व पक्षप्रवेश आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

सेनगाव येथील साईकल्प हॉटेल येथे दिनांक २२ ऑक्टोंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या वतीने बूथ बांधणे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या बूथ बांधणीमध्ये येणाऱ्या विधानसभेसाठी शासनाने राबवलेल्या योजना नागरिकापर्यंत पोहोचून नागरिकांना मार्गदर्शन करावे असे आव्हान हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी केले आहे .राज्य सरकार व केंद्र शासन यांनी अनेक योजना राबवल्या असून त्या योजना नागरिकांच्या घरोघरी पोहोचून त्यांना मार्गदर्शन करावे येणाऱ्या विधानसभेला नक्कीच महायुती सरकारला याचा फायदा होईल व तसेच काही कार्यकारणी मंडळींची निवड करण्यात आली असून,शैलेश भाऊ तोष्णीवाल ह्यांची व्यापारी आघाडी जिल्हा उपाध्क्षपदी निवड करण्यात आली,या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे पद अधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते तसेच शिवसेना (शिंदे गट )राष्ट्रवादी (अजित पवार गटाचे ) सर्व कार्यकर्ते पद अधिकारी उपस्थित होते येणाऱ्या विधानसभेसाठी जयत तयारी करून दिनांक २८ /१०/ २०२४ रोजी हिंगोली विधान सभेसाठी आमदार तानाजीराव मुटकुळे यांचा अर्ज दाखल करण्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आव्हान करण्यात आले,



# कर्जत जामखेड मधील मतदारांनी आ.रामजी शिंदे साहेबांच्या पाठीसी ठाम उभे राहून आपल्या तालुक्याचा स्वाभिमान दाखवावा-दिपकराव सोंडगे

लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले

कर्जत जामखेड मधील सुजाण मतदारांनी आ.प्रा.रामजी शिंदे साहेबांना मतदान करून आपल्या गावचा व तालुक्याचा स्वाभिमान बारामतीला विकु न देता भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार माजी मंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार प्रा.आ.राम शिंदे यांना मतदान करण्याचे आवाहन भाजपा युवा नेते दिपकराव सोंडगे यांनी केले आहे.

ते यावेळी बोलताना म्हणाले , भूमिपुत्र आमदार राम शिंदे साहेबांना विधानसभेची उमेदवारी रविवारी जाहीर होताच भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी व वरिष्ठ नेत्यांनी जल्लोष व्यक्त करत आ. राम शिंदे साहेब यांच्या विजयाचा संकल्प केला .

यावेळी बोलताना युवा नेते दीपकराव सोंडगे म्हणाले की , आमदार प्रा राम शिंदे यांनी सेवादार म्हणून मतदारसंघात काम केले. जनतेचा सेवेकरी म्हणून काम केले. त्यामुळे पक्षाने त्यांना सलग चौथ्यांदा उमेदवारी बहाल केली. कर्जत-जामखेडमध्ये होणारी निवडणूक सामान्य नाही, मागील पाच वर्षात मतदारसंघातील कार्यकर्त्यांना मोठा संघर्ष करावा लागला.परंतू यंदा विरोधकाला असे हरवा की, यापुढेही कोणत्याही बाहेरच्या उमेदवाराला तुमच्या मतदारसंघात येऊन निवडणूक लढवण्याची तलफ झाली नाही पाहिजे. त्यासाठी मोठ्या ताकदीने कामाला लागा, जोश आणि बुध्दीने ही निवडणूक लढवा, कर्जत जामखेडच्या स्वाभिमानासाठी आणि आपल्या मातीतल्या भूमिपुत्राला जिंकून आणण्यासाठी जोमाने कामाला लागा, असे आवाहन त्यांनी केले.

आपला तो आपलाच असतो ,स्थानिक नेते , कार्यकर्ते यांच्या स्वप्नांचा आ.रोहित पवार यांनी केलेला भ्रमनिरास, दादागिरी,हुकूमशाही, दडपशाही, खुन्नसपणा यामुळेच आ.राम शिंदे यांना आपला तो आपलाच असतो असे म्हणत सर्व नेत्यांनी एकत्र येत प्रेमळ,शांत,संयमी,असलेल्या प्रा. राम शिंदे यांना साथ दिली पाहिजे. आ .पवारांनी कर्जत जामखेड मधील जनता आणि त्यांचे स्थानिक प्रश्न याकडे त्यांचे साफ दुर्लक्ष झाल्याचे दिसते.सोशल मीडियाची हवा त्यांच्या डोक्यात गेल्याचे दिसते. मतदारसंघातील प्रश्नावर आ.पवार कोणतेही लक्ष घालत नाहीत. मतदासंघात अभावानेच दिसणारे रोहित पवार आता कर्जत जामखेड करांना नकोसे वाटू लागले आहेत.

भूमिपुत्र आ. राम शिंदे साहेबांनी मंत्री पदात केलेली विकासकामांनी कर्जत जामखेड मतदार संघाची वेगळीच ओळख निर्माण झाली.आमदार राम शिंदे साहेब यांची सर्वसामान्य जनतेबरोबर नाळ जुळली गेली आहे. मंत्री पदाच्या काळात त्यांनी मतदार संघाचा जलसंधारण व इतर कामांनी मतदार संघाचा कायापालट केला. आपल्या कर्जत जामखेड मतदार संघातील भूमीसाठी गेली २० वर्ष केलेल्या अविरत कार्यामुळे आ. प्रा .राम शिंदे साहेबांना पहिल्याच यादीत उमेदवारी जाहीर झाली.कर्जत जामखेडचा भूमीपुत्र या नात्याने आपल्या भूमीच्या उत्कर्षासाठी कर्जत जामखेड मतदार संघ सुजलाम सुफलाम करण्यासाठी आ.शिंदे साहेबांसाठी येणारे ३० दिवस वैयक्तिक जनसंपर्क करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# मुखेड-कंधार विधानसभा निवडणुक अपक्ष उमेदवार म्हणून लढवणार- बालाजी पाटील खतगावकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड । शिवकुमार बिरादार

दिनांक २१ रोजी शिवसेना पक्ष कार्यालय मुखेड येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी मा. बालाजी पाटील खतगावकर म्हणाले की मुखेड कंधार मतदासंघाच्या सर्व्हे मध्ये पहिल्या स्थानावर आहे. प्रत्येक पक्ष आपली ताकद आजमावत असतो. त्यांचा निर्णय करावा लागतो. मुखेडचा विकास हेच माझं एकमेव ध्येय आहे. पंच्याहत्तर वर्षात जो विकास झाला नाही तो पाच वर्षात करून दाखवनार जनतेच्या प्रतिसादामुळे मी इथपर्यंत आलो आहे.

आम्ही आता माघार घेतली तर जनता माफ करणार नाही. त्यामुळे कोणत्याही पक्षाला विरोध न करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेनुसार मी अपक्ष निवडणुक लढवणार आहे. आता ही लढाई जनतेच्या दरबारात आहे. जनतेने परिवर्तनासाठी साथ दिलीय म्हणून मी समाजसेवेचे व्रत घेऊन काम करणार आहे. जरी आम्हाला संधी मिळाली नाही तरी आमचे विकास कार्य सुरू राहील. शेती ओलीताखाली आणणे, शेतीचा विकास करणे बेरोजगारांना रोजगार देणे छोटे उद्योग महामंडळाच्या माध्यमातून लोकांना आर्थिक सहाय्य करणे नोकरी न करता स्वतः मालक मी मान्य जर



होऊन लोकांच्या हातला कान देणे म्हत्वाचे आहे या माध्यमातून शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे भलं करणे हे आमचे पहीलं ब्रिद आहे असे म्हणाले पुढील पाच वर्षासाठी विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार आहे. कोणी कितीही मोठा असू द्या, जनतेला विकत घेऊ शकत नाही, असे यावेळी स्पष्ट केले. यावेळी श्री. व्यंकटराव पाटील गोजेगावकर (माजी शिक्षण सभापती जिल्हा परिषद नांदेड), श्री. गुणवंतराव पाटील हंगरगेकर (शेतकरी संघटना नेते), श्री. शिवराज पाटील मसलगेकर (शेतकरी संघटना नेते) सभापती अशोकराव पाटील रात्रीकर, शिवसेना जेष्ठ नेते शंकर पाटील लुटे, अजित पवार गटाचेमामा वाढीकर, डॉ. रामराव श्रीरामे, शिवसेना नेते सुभाष काटे, नारायण गायकवाड, प्रितमकुमार गवाले, मुस्लीम समाजाचे नेते सादिक तांबोळी,आंबेडकर चळवळीचे नेते श्रवण नस्वाने, बालाजी पाटील डोसणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# मेक्सिको च्या टोलासा युनिव्हर्सिटी कडून डॉ.शिवलाल जाधव डॉक्टरेट पदवी प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

रांजणगाव गणपती । प्रतिनिधी

पाबळ ता. शिरूर येथील भटक्या विमुक्त जाती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवलाल अंबाजी जाधव यांना मेक्सिको ( अमेरिका) येथील युनिव्हर्सिटी ऑफ टोलासा यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉक्टरेट पदवी व्हॉइस चान्सलर डॉ.कोट्टारामान व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. लातूर येथे झालेल्या पदवीदान समारंभाला बहुसंख्य लोकांचा उपस्थित कार्यक्रम पार पडला.

डॉ.शिवलाल जाधव यांनी चाळीस वर्षांपूर्वी पुणे येथे भटक्या विमुक्त जाती शिक्षण संस्था स्थापन करून मूक बधिर आश्रम शाळा, अनाथ मुलांसाठी आश्रम शाळा, व मतिमंद मुलांसाठी आश्रम शाळा काढल्या असून हजारो शिक्षण देऊन मुलांना प्रवाहात आणले आहे. आज त्यांच्याकडे वाघोली येथील शिक्षण संकुलात प्राथमिक व माध्यमिक शाळा, बालक अनाथ आश्रम आहे, मूकबधिर शाळा आणि पाबळ येथे मतिमंद मुलांची शाळा आहे. पाबळ येथील शाळेतून समुदाय आधारित



दिव्यांगांचे पुनर्वसन कार्यक्रम राबवून त्यांनी हजारो दिव्यांगाना मदत केली आहे. त्यामध्ये सर्टिफिकेट, व्हीलचेअर्स, पांढऱ्या काठ्या, तीन चाकी सायकल दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देणे, दिव्यांगांच्या शस्त्रक्रिया करणे असे उपक्रम राबवले आहेत. नर्सिंग कॉलेज, महिलांना विविध रोजगार उपलब्ध करून देणे इत्यादी काम मोठ्या प्रमाणावर केले आहे. त्यांना विविध संस्थांनी व अनेक विद्यापीठांनी विविध पुरस्काराने आले आहे. विक्रमशिला हिंदी विद्यापीठ गया (बिहार ) येथील विद्यापीठाचे ते कुलपती आहेत. तसेच त्यांचे अनाथांचा बाप हे हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील व देशातील विविध सामाजिक चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान आहे. विद्यापीठा मिळालेल्या डी. लिट पदवी बद्दल त्यांचे विविध संस्थांनी व समाजाने अभिनंदन केले आहे.

# जनतेला वाटते मारोतराव कवळे गुरूजी खासदार व्हावेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । प्रतिनिधी

नांदेड जिल्हातील जनतेला वाटते मारोतराव पाटील कवळे गुरुजी खासदार व्हावेत कारण तुम्ही आहात शेतकऱ्यांचे भाई...! तीन कारखाने काढून,पाच हजार बेरोजगारांना काम देऊन झालात त्यांची आई..! विरोधी काहीही बोलो पण तुमच नाव जनतेचा मनात आहे ठाई ठाई...! एका सामान्य कुटुंबातील व्यक्ती ज्याने कष्टाने रक्ताचे पाणी करून ३ कारखाने २० पतपेढ्या उभारल्या आणि बेरोजगारांना काम दिलं...स्वतः कर्ज काढून लोकांना हातभार लावला.... अशा वाघाचा तो छावा खासदार झाला पाहिजे असे नांदेड जिल्हातील जनतेला वाटते.स्वतः उभे राहून शेतकऱ्याला बसायला गुरुजी खुर्ची देतात म्हणूनच तर कवळे गुरुजी शेतकरी नेते म्हणून ओळखले जातात राम राज्य का यावं अस लोकांना वाटतं कारण राम राज्य हे शेतकरी आणि गरीब जनतेला न्याय देणार राज्य होत.योगायोगाने दिवाळी जवळ आली असून दिवाळीला आपल्या कडे म्हणतात इडा पिडा टळू दे बळी चे राज्य येऊ दे.मग हा बळीराजा कोण..? बळीराजा म्हणजे शेतकरी राजा...आणि जर शेतकऱ्यांचं राज्य हवय तर मग गुरुजी खासदार झाले पाहिजेत असे नांदेड जिल्हातील जनतेला वाटते.



## काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगु लागला

# कालच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान;स्थळ पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

काल दिवसभर झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांच्या कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगताना पाहुन शेतकरी हवालदिल झाला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी,मंडळ अधिकारी अशोक डरपे,तलाठी नेवडे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या बदलीनंतर अतिरिक्त पदभार स्वीकारलेले साळवे, कृषी सहाय्यक रामेश्वर पेजगुडे, कृषी पर्यवेक्षक राजेंद्र राऊत यांच्याशी फोनवरून संवाद साधत नुकसानीचे व्हिडिओ आणि फोटो पाठवुन तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. गट नंबर २२१शेतामध्ये अडीच एकर कांद्याची लागवड केलेली असुन एक एकर काढणीस आलेला कांदा कालच्या मुसळधार पावसामुळे पाण्यावर तरंगत असुन जमेल तसा गोळा करत आहोत. नगर, सोलापूर याठिकाणी कांदा विक्रीसाठी पाठवायचो.परंतु काढणीवर आलेला कांदा पावसामुळे खराब झाल्याने वजनात घट



येणे, कांद्याचे आवरण सडणे रात्रभर पावसात कांदा कुजल्याने कांद्याला बाजारात भाव मिळत नाही त्यामुळे संपूर्ण कांदा पिक वाया गेले असुन शासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पिडीत शेतकरी आश्रुबा प्रभु कोळपे यांनी केली आहे.

शेतकऱ्यांना क्रॉप इन्शुरन्स अप माध्यमातून झालेल्या नुकसानीची माहिती स्वतः भरायची याद्वारे माहिती भरल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी हे पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर येणार आहेत आता ग्रामीण भागातील बहुतांश अडाणी शेतकऱ्यांना याप्रकारे तक्रार नोंदवता येत नसल्याने फोन वरून माझ्याशी संपर्क करतात आणि त्यानंतर मी महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती कळवतो. त्यानंतर पंचनाम्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी येतात.

# परळीसह महाराष्ट्रात एमआयएम इन्कलाब पक्ष ४३ जागा लढविणार-राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.खवी अब्बासी

## परळी मतदारसंघातील पहिल्या उमेदवाराची अधिकृत घोषणा;एमआयएम इन्कलाब पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष शेख मुस्तफांना उमेदवारी जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

परळी ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाची परळी शहरात पदाधिकारी मेळावा व आढाव बैठकीत परळीसह महाराष्ट्रात ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत ए.आय.एम.आय.एम.पक्ष ४३ जागा लढविणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी यांनी सांगितले. तसेच ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाच्या संपर्क कार्यालयाचे शुभारंभ राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.ख़वी अबबासी यांच्या हस्ते करण्यात आला असल्याची माहिती एमआयएम इन्कलाब पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष मुस्तफा शेख यांनी दिली आहे.

ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत (ए.आय.एम.आय.एम) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड, ख़वी अब्बासी साहेब हे महाराष्ट्रतील विधानसभा निवडणुक अनुषंगाने बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ दौऱ्यावर रविवार दि.२० ऑक्टोबर रोजी आले होते. विधानसभा निवडणुकीचा आढावा बैठक घेऊन विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच विधानसभा निवडणुकीच्या महाराष्ट्रातील इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आली. लवकरच उमेद्वारची अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सागीतले. महाराष्ट्रात एमआयएम इन्कलाब पक्ष ४३ जागा लढविणार असल्याचे त्यांनी सागीतले. ऑल इंडिया मजलीस ए इन्कलाब ए मिल्लत पक्षाचा राज्यव्यापी कार्यकर्त्या मेळावात विविध विषयावर मार्गदर्शन केले. तसेच राज्यातील अनेक प्रश्नावर पत्रकार परिषद घेऊन आवाज उठविणार असल्याचे त्यांनी सागीतले. या मेळाव्यास हैदराबाद येथील पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड,ख़वी अब्बासी यांच्यासह अब्दुल माजीद अत्तार साहेब, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नासेर, समीउल्ला आझाद, खाजा मैनोद्दीन, अझीमोदिन खान, मोहमद हाजी आली, हबीब रिजवान आशमी, इमत्याजोद्दीन, नांदेड जिल्हाध्यक्ष खमर भाई, परभणी जिल्हाध्यक्ष शेख सलीम भाई, औरंगाबादचे जिल्हाध्यक्ष समदभाई बागवान, व पक्षाचे सर्व पदाधिकारी व जिल्हाध्यक्ष हे उपस्थित होते. तसेच परळी मतदारसंघातील पहिल्या उमेदवाराची अधिकृत घोषणा करण्यात आली. यामध्ये परळीतील एमआयएमचे उमेदवार म्हणून शेख मुस्तफांना संधी देण्यात आली आहे. या उमेदवारीचे सर्वत्र स्वागत होत आहे. या सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन शेख मुस्तफा यांनी मानले.




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904